# महिला सक्षमीकरणामध्ये ग्रंथालयांची भूमिका

**सौ. उज्वला अर्जुन पवार,** लायब्ररी असिस्टंट कासेगाव एज्युकेशन सोसायटीज राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेकनॉलॉजि, राजारामनगर. शिवाजी युनिव्हर्सिटी संलग्नित.

**सौ. स्वाती नरेंद्र केखलेकर,** लायब्ररी असिस्टंट कासेगाव एज्युकेशन सोसायटीज राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेकनॉलॉजि, राजारामनगर. शिवाजी युनिव्हर्सिटी संलग्नित.

---

**सारांश-**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळणे. महिलांना त्यांचे हक्क आणि अधिकार प्राप्त होणे. महिलांना जीवन जगात असताना कोणतेही अडथळे येऊ नयेत यासाठी सक्षम बनविणे. महिलांच्या सक्षमीकारणांमध्ये अनेक घटक समाविष्ट आहेत. ग्रंथालयेही महिलांच्या सक्षमीकारणांमध्ये महत्वाची भूमिका बजावत असतात. ग्रंथालये हि नुसती पुस्तकांची भंडारे नसून ज्ञान विज्ञान आणि कला यांचे माहिती पुरविणारे स्रोत आहेत. आधुनिक ग्रंथालये हि पुस्तकांबरोबरच वेगवेगळ्या उपक्रमातून नवनवीन तंत्रज्ञानाची हि माहिती महिलांपर्यंत पोहचवत असतात. या पेपर मध्ये महिला सक्षमीकारणांमध्ये ग्रंथालयांचे योगदान याचा अभ्यास केला आहे तसेच ग्रंथालये विविध उपक्रमातून अजून कोणत्या प्रकारे हातभार लावू शकतात याच्या शक्यता मांडल्या आहेत.

**किवर्ड**:- ग्रंथालय , महिला सक्षमीकरण , ग्रंथालय उपक्रम.

**प्रस्तावना**:-

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय भेदभाव दूर करण्याचा प्रयत्न करणे . महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समाजात, कुटुंबात हक्क, अधिकार आणि दर्जा मिळतो.

महिला सक्षमीकरण हा सामाजिक प्रगतीचा एक मूलभूत पैलू आहे, ज्यामुळे महिलांना शिक्षण, आर्थिक संधी आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सामान अधिकार प्राप्त होतो. ज्ञान आणि शिक्षणाचे केंद्र म्हणून ग्रंथालये महिलांना त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासासाठी आवश्यक असलेली संसाधने आणि कौशल्ये प्रदान करून या सक्षमीकरणात महत्त्वाची भूमिका बजावतात. ग्रंथालयांमुळे महिलांना शिक्षण, रोजगार, कायदेशीर हक्क, आरोग्य आणि उद्योग क्षेत्रातील सर्वसमावेशक माहिती मिळते , ज्यामुळे त्यांचे आर्थिक , राजकीय , मानसिक सक्षमीकरण होण्यास मदत मिळते आणि त्यांचे स्वातंत्र्य आणि आत्मविश्वास वाढतो. जगाच्या विविध भागात, विशेषतः ग्रामीण आणि उपेक्षित समुदायामधील महिलांना निरक्षरता, डिजिटल कौशल्यांचा अभाव, शिक्षणाच्या तुटपुंज्या संधी , करियरच्या संधी मधील मर्यादा या सारख्या अनेक अडथळयांना तोंड द्यावे लागते. अशा वेळेस ग्रंथालये 'ग्रंथालये साक्षरता कार्यक्रम', 'व्यावसायिक प्रशिक्षण' 'ग्रंथालय भेट, अशा विविध उपक्रमातून तसेच डिजिटल संसाधने देऊन महिलांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करत असतात. हा पेपर महिलांची साक्षरता, निर्णय घेण्याची क्षमता, महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय सहभागाला पाठिंबा देऊन महिला सक्षमीकरणामध्ये ग्रंथालयाचे महत्वपूर्ण योगदान अधोरेखित करतो.

**उद्दिष्ट्ये -**

1) महिला सक्षमीकारणांमध्ये ग्रंथालयांचे योगदान समजून घेणे.

2) ग्रंथालयातील माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान साधने आणि सेवांच्या वापरातून महिला सक्षमीकरणासाठी ग्रंथालयांकडून राबविल्या जाऊ शकणाऱ्या उपाययोजना सुचविणे.

**ग्रंथालये-**

ग्रंथालय म्हणजे ज्या ठिकाणी ग्रंथ एकत्र करून त्याचे जतन , संरक्षण केले जाते अशी जागा अशी पूर्वी ग्रंथालयाची व्याख्या होती. पण आधुनिक काळात ग्रंथ,नियतकालिके , वृत्तपत्रे , दृकश्राव्य साधने मुद्रित व अमुद्रित साहित्य याचा संग्रह ग्रंथालयात असतो तर सध्याच्या माहिती युगात, संगणक, सीडी, डीव्हीडी, ई- पब्लिकेशन्स, रिपॉझीटरीज या तांत्रिक गोष्टींची पण ग्रंथालयात भर पडली आहे. पूर्वी ग्रंथपाल हा ग्रंथांचा कस्टोडियन होता. तर सध्याच्या काळात ग्रंथपालची भूमिका बदलली असून वाचकांच्या गरजा पूर्ण करणे , समाजामध्ये ज्ञानाचा प्रसार करणे , त्याचे मनोरंजन करणे, वाचन सवयी वृध्दीगंत करणे , वाचक साक्षरता वाढवणे , समाजामध्ये समृद्ध नागरिक तयार करणे , त्याना मार्गदर्शन करणे यासाठी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे त्यासाठी विविध उपक्रम राबविणे

अश्या प्रकारे ग्रंथालयाच्या कामाची व्याप्ती वाढली आहे . ग्रंथालयांना पूर्वीपासूनच समाज उन्नती मधील एक प्रभावी घटक म्हणून पहिले जाते.

**पूर्व साहित्याचा अभ्यास-**

1) Role of Library on Women's Empowerment by MD. Ashikuzzaman (2018) या पेपर मध्ये ग्रंथालय महिला सक्षमीकरणात कशी भूमिका बजावतात आणि अजून कश्या प्रकारे कार्य करू शकतात याचा अभ्यास केला आहे.
2) महिला सक्षमीकरणात ग्रंथालयांची भूमिका लेखक श्री. यशवंत एस. चौधरी, श्री. हेमंत एस. भोये आणि अर्चना कोरी (2024) या पेपर मध्ये महिला सक्षमीकरणात ग्रंथालये सध्या करत असलेले कार्य, अजून उपाययोजना तसेच महिलांसाठी असणारी काही विद्यापीठ ग्रंथालये माहिती केंद्रे यांचा अभ्यास केला आहे.
3) Role of Public Libraries on Women Empowerment: A Study with Special Reference to District Library Malappuram by Sasi P.K (2014) या पेपर मध्ये सार्वजनिक ग्रंथालय महिला सक्षमीकरणात कशी भूमिका बजावतात याचा अभ्यास केला आहे.
4) Role of Public Library on Women Empowerment in Dehradun District Mahesh Chandra Belwal (2021) या पेपर मध्ये डेहराडून जिल्यातील सार्वजनिक ग्रंथालय महिला सक्षमीकरणात कशी भूमिका बजावतात याचा अभ्यास केला आहे.

**महिला सक्षमीकरणांमध्ये ग्रंथालयांची भूमिका:-**

ग्रंथालये आणि महिला सक्षमीकरण यांचा परस्परांशी घट्ट संबंध आहे. महिलांना त्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी, तसेच विविध कौशल्ये अवगत करण्यासाठी विविध प्रकारच्या सेवा प्रदान करून ग्रंथालय महत्वाची भूमिका पार पाडतात. ग्रंथालये हि ज्ञानाचे भांडार असून, त्या माध्यमातून महिलांना सरकारी निधीद्वारे समर्थित विविध संसाधने, शिक्षण, आत्मनिर्भरता आणि समाजात समान संधी मिळण्यास मदत होते. महिलांमध्ये आत्मविश्वास आणि कौशल्य वाढवण्यासाठी ग्रंथालये खास पुस्तके, संशोधन लेख आणि डिजिटल स्रोत उपलब्ध करून देतात. याद्वारे महिलांच्यामध्ये त्यांच्या हक्कांबाबत आणि कायद्यांविषयी जागरूकता निर्माण होते. तसेच ग्रंथालयाद्वारे महिलांना आरोग्य, मानसिक आरोग्य, आहार आणि मातृत्व यासंबंधी महत्त्वपूर्ण माहिती मिळते या माहितीच्या आधारे त्यांची आरोग्यदायीजीवनशैली आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढते. आधुनिक ग्रंथालयांमध्ये इंटरनेट आणि संगणक उपलब्ध करून दिले जातात,ज्यामुळे महिलांना डिजिटल तंत्रज्ञान शिकता येते. तसेच या सुविधांच्या मदतीने ऑनलाइन कोर्सेस आणि माहिती स्रोतांचा उपयोग करून महिला करिअरच्या संधी शोधू शकतात.

महिलांसाठी ग्रंथालये म्हणजे वाचनाचे स्थळ नसून, सामाजिक परिवर्तनाचे केंद्र आहे. महिलांचे शिक्षण, सक्षमीकरण आणि स्वतंत्र विचारसरणी या मध्ये ग्रंथालयाचा महत्वाचा वाटा आहे. त्यामुळे अधिकाधिक महिलांनी ग्रंथालयांचा लाभ घ्यावा आणि ज्ञानाच्या माध्यमातून स्वतःला सक्षम व आत्मनिर्भर बनवावे. महिलांच्या शिक्षणापासून ते आत्मनिर्भरतेपर्यंतच्या प्रवासात ग्रंथालयांची भूमिका महत्वाची असून त्यातील काही महत्वाचे मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

1) ज्ञान केंद्र: शिक्षणाद्वारे महिलांना सक्षम बनवणे

शिक्षणाद्वारे महिलांना सक्षम बनवण्यामध्ये ग्रंथालये ही ज्ञानाची केंद्रे म्हणून महत्वपूर्ण भूमिका बाजवतात ही केंद्रे महिलांना विविध शैक्षणिक संसाधने उपलब्ध करून देतात आणि त्याद्वारे त्यांचे ज्ञान आणि कौशल्य वाढवण्यास मदत करतात. विविध विषयांवरील पुस्तके जसे भाषा, विज्ञान तसेच साहित्य आणि महिलांना अद्ययावत ज्ञान मिळवण्यासाठी संशोधन पेपर्स आणि मासिके उपलब्ध करून देत असतात त्यामुळे महिलांच्या शैक्षणिक विकास होतो. महिलांसाठी विनामूल्य किंवा सवलतीच्या शैक्षणिक फी मध्ये अनके कोर्सेसे ग्रंथालये उपलब्ध करून देतात.

2) माहिती व सांस्कृतिक केंद्र

ग्रंथालये केवळ पुस्तके वाचनाची जागा नसून माहिती व सांस्कृतिक केंद्रे म्हणूनही महत्त्वाची भूमिका बजावतात. ती समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी माहितीचा स्रोत, संस्कृतीचा प्रसारक आणि संवादाचे व्यसपीठ आहेत .

डिजिटल लायब्ररी आणि ई-बुक्सच्या माध्यमातून माहिती उपलब्ध करून देणे, मार्गदर्शन शिबिरे व परीक्षांची तयारी करण्यासाठी वर्ग आयोजित करणे,संगणक व इंटरनेटसह डिजिटल स्रोत वापरण्याचे प्रशिक्षण देणे , महिलांचे हक्क, कायदे यांची माहिती मिळवण्यासाठी ग्रंथालय उपयुक्त ठरतात.

3) सामाजिक आणि मानसिक विकास

महिलांना विविध वाचन साहित्याच्या वाचनामुळे वेगवेगळया विचारसरणी समजून घेण्यास मदत होते आणि त्या विविधांगांने समाजाशी जोडल्या जातात. ग्रंथालयाद्वारे आयोजित विविध चर्चासत्रे , वादविवाद , वाचन गट याद्वारे महिलांना त्याचे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देऊन विविध सामाजिक गटांतील महिलांना त्याचे विचार मांडण्यासाठी प्रेरित केले जाते यामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढतो. वाचन हे मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त आहे .वाचन मानसिक तणाव कमी करून सकारात्मक विचार विकसित करते नैराश्य दूर करण्यासाठी मदत करते ग्रंथालये हि महिलानांसाठी विविध प्रकारचे वाचन साहित्य उपलब्ध करून देऊन त्याच्या मानसिक विकासास मदत करत असतात .

4) करिअर आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मदत

महिलांना करिअर आणि व्यावसायिक शिक्षणासाठी ग्रंथालये हि मार्गदर्शक केंद्रे म्हणून विकसित होत आहेत. महिलांसाठी स्पर्धा परीक्षा, नोकरीसंदर्भातील पुस्तके, संशोधन पेपर्स आणि मासिके ग्रंथालये सहज उपलब्ध करून देत असतात तसेच महिलांसाठी मोफत करिअर गाईडन्स कार्यशाळा आणि व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित केले जातात त्याचबरोबर अद्ययावत संगणक आणि डिजिटल संसाधनानाबद्दल प्रशिक्षण देऊन महिलांना ऑनलाईन जॉब्स बद्दल माहिती पुरवली जाते.याप्रकारच्या सुविधांमुळे महिलांना विविध क्षेत्रात करियरच्या संधी उपलब्ध होत आहेत . तसेच तांत्रिक शिक्षण आणि व्यावसायिक कोर्सेससाठी भरपूर प्रमाणात ग्रंथसंपदा, विविध भाषा, संवाद कौशल्ये आणि मुलाखत तंत्र शिकण्यासाठी ग्रंथालयांमध्ये प्रशिक्षण वर्ग आयोजित करत असतात त्यामुळे महिला उद्योजकतेला चालना मिळते.

विविधप्रकारच्या सेवा , सुविधा आणि मार्गदर्शन देऊन महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रंथालये चालना देत असतात आणि त्यांना शिक्षित व आत्मनिर्भर आणि सक्षम बनवत असतात.महिलांना त्यांच्या जीवनाच्या विविध पैलूंमध्ये सक्षम करण्यासाठी ग्रंथालयांना योग्य उपाययोजना सुचवणे

महिला सक्षमीकरण आणि साक्षरतेचा पाठपुरवठा करताना ग्रंथालय महिलांच्या विविध गरजा पूर्ण करून महत्वाची भूमिका बजावतात. महिलांना सक्षम करण्यासाठी माहिती आणि संसाधने यांचा समतोल वापर करणे हे ग्रंथालयांचे महत्वाचे ध्येय आहे. महिलांची आर्थिक , सामाजिक औद्योगिक उन्नतीमध्ये ग्रंथालये विविधप्रकारे साहाय्य करू शकतात काही उपाययोजना राबवू शकतात. महिलांच्या बौद्धिक सक्षमीकरणाबरोबरच ग्रंथालये महिलांच्या संपूर्ण सक्षमीकरणाचे कार्य करू शकतात. अशाच काही उपाययोजन खालील प्रमाणे:

1) व्याख्यानमालांचे आयोजन:-

ग्रंथालयाने विविध विषयावरील व्याख्यानांचे आयोजन करावे यामुळे महिलांना उत्तम माहिती वेगवेगळया महापुरुषांची चरित्रे विशेषतः इतिहासातील लढवय्या महिला, आधुनिक जगात वेगवेगळया क्षेत्रातील कर्तबगार महिला यांची चरित्रे कळतील त्यांची माहिती कळेल ही माहिती स्त्रियांना सक्षम कणखर बनवण्यास निश्चित उपयोगी पडेल

2) विविध स्पर्धांचे आयोजन:-

ग्रंथालयांनी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करावे त्यामध्ये अगदी रांगोळी, पेंटिंग पासून काव्यवाचन, निबंध,भाषण इत्यादींचा समावेश असावा याद्वारे त्यांना व्यासपीठ मिळेल त्यांच्या अंगाच्या कलागुणांना वाव मिळेल कदाचित यातून एखादी चा व्यवसाय पण उभा राहू शकेल

3) कार्यशाळांचे आयोजन:-

संगणक प्रणालींची माहिती देण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कसा करावा यासाठी वेगवेगळ्या कार्यशाळा भरवाव्यात.

4) बहिस्थ महिलांसाठी मेंबरशिप:-

जे ग्रंथालय सार्वजनिक आहेत तिथे समाजातील सर्वजण मेंबर होऊ शकतात पण शाळा किंवा महाविद्यालयीन ग्रंथालयात फक्त त्यांचे विद्यार्थीच मेंबर असतात अशा ग्रंथालयांनी बहिस्थ लोकांसाठी मेंबरशिप चालू केल्यास तेथील विपुल ज्ञानाचा त्याचा उपयोग समाजातील गरजू विशेषता महिलांना घेता येईल.

5) स्पर्धा परीक्षेची तयारी:-

सध्या वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी असणाऱ्या स्पर्धा परीक्षांना बसण्याचे महिलांचे मुलींचे प्रमाण खूपच जास्त आहे त्यांच्यासाठी ग्रंथालयाने त्यांना आवश्यक असणारे वाचन साहित्य उपलब्ध करून दिले पाहिजे त्यांच्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली तर त्याचा उपयोग समाजातील बहुसंख महिलांना होईल.

6) चर्चासत्रांचे आयोजन:-

महिला किंवा मुलींमध्ये बोलण्याचे भय जावे यासाठी वेगवेगळ्या विषयावर चर्चासत्रांचे आयोजन करावे त्यामुळे त्यांची मते त्या स्पष्टपणे मांडू शकतील त्याचबरोबर त्यांना बोलण्याचे, विचार करून मत मांडण्याचे धारिष्ट प्राप्त होईल. अश्या प्रकारे महिलांना व्यक्त होण्यासाठी प्लॅटफॉर्म तयार करावा.

7) आर्थिक साक्षरता:-

महिला आर्थिक साक्षर व्हाव्यात यासाठी नुसते पैसे मिळवून उपयोग नाही तर ते योग्य ठिकाणी गुंतवणे हे महत्त्वाचे असते यासाठी ग्रंथालय विविध कार्यक्रमाचे आयोजन करू शकतात.

8) महिलांसाठी वेगळी बैठक व्यवस्था:-

अनेक सार्वजनिक ग्रंथालयात महिलांसाठी वेगळी बैठक व्यवस्था करता येऊ शकते जेणेकरून त्या तिथे येऊन वाचन करू शकतात.

9) आरोग्य साक्षरता:-

अनेक ठिकाणी महिला स्वतःच्या आरोग्याच्या बाबतीत अजूनही जागरूक नसतात काही गोष्टी स्वतःहून बोलून त्याची माहिती घेत नाहीत त्यामुळे बऱ्याच वेळा त्यांना शारीरिक तसेच मानसिक गोष्टींना तोंड द्यावे लागते यासाठी ग्रंथालयाने पुढाकार घेऊन महिलांमध्ये शारीरिक तसेच मानसिक आरोग्य साक्षरता वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत.

10) आरोग्य शिबिरांचे आयोजन :-

महिलांसाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे. त्यांना आरोग्याच्या बाबतीत माहिती देऊन आरोग्य तपासणीचे महत्व पटवून द्यावे.

11) तणाव मुक्ती साठी कार्यशाळा :-

महिलांना अनेक प्रकारचे तणाव असू शकतात पण ते आपले मानसिक आरोग्य बिघडवतात हे त्यांच्या लक्षात येत नाही किंवा त्या साठी त्या मुकले पानाने बोलत नाहीत म्हणून त्यांचा तणाव कसा कमी होऊ शकतो याची माहिती देणारी कार्यशाळा आयोजित कराव्यात.

12) स्वसौरंक्षणा साठी कार्यशाळा:-

सध्याच्या काळात प्रत्येक मुलगी अथवा महिला काही कामा निमित्त घराच्या बाहेर असेल तर तिला तिचे संरक्षण करता आलेच पाहिजे. त्यासाठी तिने काही टेकनिक शिकणे अतिशय महत्वाचे आहे. अश्याच प्रकारच्या काही कार्यशाळा आयोजित करून महिलांना स्वसंरक्षणाचे महत्व आणि प्रात्यक्षिक दाखवणारे कार्यक्रम आयोजित करावेत.

13) कायद्याची माहिती देणाऱ्या कार्यशाळा:-

आज काल महिलांच्या बाजून अनेक कायदे झाले आहेत. पण समाजातील सर्वच महिलांना त्याचे ज्ञान नसते. तसेच अजून जे कायदे महिलांना माहिती असणे जरुरी आहे त्या बद्दल अश्या कार्यशाळांमधुन जनजागृती करता येऊ शकेल.अश्या विविध कार्यक्रमांमध्ये समाजातील विविध स्तरातील परंपरेतील महिला एकत्र आल्यामुळे त्यांच्यात विचार, रूढी, परंपरा इ. माहितीची देवाण घेवाण होऊन एकप्रकारे समाज प्रबोधनाचे कार्य होईल.

**निष्कर्ष-**

ग्रंथालये हि सर्वसमावेशक आणि चैतन्याने भरलेली गतिमान केंद्रे किंवा संस्था आहे. ती महिलांच्या आयुष्यात अनेक प्रकारचे सकारात्मक बदल घडवून महिलांना सक्षम करण्यामध्ये महत्त्व पूर्ण भूमिका बजावत असते. महिलांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे वाचन साहित्य पुरवून तसेच त्यांच्या साठी वेगवेगळ्या विषयावरील वर्कशॉप्स, सेमिनार आयोजित करून प्रसंगी एखाद्या कार्यक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग घेऊन ग्रंथालये महिला सक्षमी करणामध्ये महत्वाचे योगदान देऊ शकतात. ग्रंथालये महिलांना फक्त आर्थिक दृष्ट्या सक्षम करत नाहीत तर त्यांना जीवनामधील विविध पातळ्यांवर तसेच शारीरिक, मानसिक सक्षम करण्यामध्ये महत्वाचे योगदान देऊ शकतात. याच बरोबर फक्त महिला सक्षमीकरण होत नसून संपूर्ण समाजामध्ये सकारात्मक बदल होऊन समाज व देश बळकट करण्याच्या कामात ग्रंथालयांचे म्हत्वाचे योगदान असू शकते.

**संदर्भसूची-**

1. MD, Ashikuzzaman. (2018). Role of Library on Women's Empowerment.
2. चौधरी यशवंत एस., भोये हेमंत एस., कोरी अर्चना. (2024). महिला सक्षमीकरणात ग्रंथालयांची भूमिका.
3. Sasi, P.K. (2014). Role of Public Libraries on Women Empowerment: A Study with Special Reference to District Library Malappuram.

4. Belwal,Mahesh Chandra.(2021).Role of Public Library on Women Empowerment in Dehradun District.
5. Dr. Konnur, M. B. डायमंड ग्रंथालय व माहितीशास्त्र कोष.
6. व्यवहारे, रंजना. (2019) महिला सशक्तीकरण आणि ग्रंथालये.
7. Kirpal, Avinash. (2016). Women Entrepreneurs inspiring stories of success, Sage.

Murti, Sudha. (2010). Leading Ladies: Women Who Inspire India, Knowledge Company.